The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
================================================================
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
---------------------------------------------------------------------------------
Vol 11.Issue 3; March 2024
================================================================

# महानुभाव संप्रदायातील साहित्यदर्शन

**श्री. गोपाल बाळासाहेब सानप**
उर्फ पू. श्रीगिरीधरदादा कपाटे महानुभाव

**प्रास्ताविक** : मराठी साहित्य हे विश्वातील सर्व साहित्यापेक्षा अभूतपूर्व अश्या स्वरूपाचे आहे. मराठी साहित्याला आकार देण्याचे काम अनेक विद्वतजनांनी केलेले आहे. मराठी साहित्याची ही साहित्यगंगोत्री आजतागायत प्रवाहित ठेवण्याचे काम महाराष्ट्रातील अनेक साहित्यकांनी केलेले आपल्या निदर्शनास येते. आज पुरोगामी आधुनिक रूपाने सादर होणाऱ्या या सरितेचा उगम हा मात्र संत साहित्यातूनच झाला आहे.

मध्ययुगीन मराठी कालखंडाचा अभ्यास करताना आपल्याला मराठी साहित्याच्या प्रारंभाचे आकलन होते, मध्ययुगीन कालखंडात यादव राजवटीत मराठी साहित्याचा अंकुर महानुभाव संप्रदायात पहिल्यांदा उगवला. पंडित म्हाइंभटांच्या रुपाने पहिला मराठी साहित्यकार या साहित्य अवकाशात सुर्यरूपाने प्रकट होऊन दीप्तायमान झाला. त्यांनी मराठी साहित्याच्या या वाङ्मयगंगोत्रीचा प्रवाह प्रवाहित केला. 'लीळाचरित्रा'च्या रुपाने रुजलेल्या या बीजांकुराला फळण्या फुलवण्याचे कार्य मग विविध संप्रदायातल्या वेगवेगळ्या धुरीणांनी केले. यामध्ये भागवत संप्रदाय, समर्थ संप्रदाय, लिंगायत संप्रदाय, नाथ संप्रदायादी अनेकांचा हातभार लागला.

महानुभाव वाङ्मय हा मध्ययुगीन महाराष्ट्रात निर्माण झालेला मराठी वाङ्मयाचा एक महत्त्वाचा प्रवाह आहे. तेराव्या शतकात महानुभाव पंथ हा महाराष्ट्रामध्ये उदयाला आला या पंथातील अनुयायांनी मराठी भाषेत साहित्याची निर्मिती केली ही मराठी भाषेतील पहिली निर्मिती होय. महानुभाव पंथाची स्थापना ही सर्वसामान्य समाज घटकांना समवेत घेऊन एका वेगळ्या विचाराकडे नेणारी होती. या संप्रदायाचे संस्थापक सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामी होत. ते मूळचे गुजराती कुटुंबातील मात्र गुजरातेतून महाराष्ट्रात आल्यावर त्यांनी महानुभाव पंथाची स्थापना केली. श्रीचक्रधरांनी ज्यावेळी आपली विचारप्रणाली महाराष्ट्रात रुजवावयास सुरुवात केली त्यावेळी महाराष्ट्रावर रामदेवराय यादवांची राजवट होती. समाजात सामाजिकदृष्ट्या अतिशय विषमता निर्माण झालेली होती. वेगवेगळे धर्मसंप्रदाय, वेगवेगळी दैवते यामुळे निर्माण झालेली अंधश्रद्धा ही अनेक पद्धतीने सामाजिक अवमूल्यन करून समाजाला आधीकच रसातळाला घेऊन जात होती. रामदेवराय यादवाच्या पंतप्रधानपदी असणारा हेमाद्री पंडित याने 'चतुर्वर्ग चिंतामणी' नावाचा ग्रंथ निर्माण करून त्यातून सामाजिक विषमतेला, जाती व्यवस्थेच्या विषवल्लीला आणि व्रतवैकल्यांच्या कर्मकांडांच्या अंधानुकरणाला खतपाणी देण्याचं काम केलं. या सरव गोष्टींपासून समाजाला एका आध्यात्मिक स्तरावर नेऊन त्यांची आत्मिक उन्नती करण्याकडे श्रीचक्रधरांनी आपले लक्ष केंद्रित केले. समाजाला या नवीन विचाराची किती प्रकर्षाने गरज आहे हे श्रीचक्रधरांनी ओळखले आणि यातूनच एका वेगळ्या विचारप्रणालीचा उदय झाला.

**विषय प्रवेश** : तेरावे शतक म्हणजे मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचा सुवर्णकाळच. ज्या सुवर्णमय साहित्यकृतींनी या शतकाचे तेज झळाळले त्यातील महानुभाव साहित्यकृतींची देदीप्यमान

प्रभा आजही मराठीच्या अभ्यासकांना दीपवून टाकते. मध्ययुगीन मराठी वाङ्मय प्रवाहात महानुभाव वाङ्मय प्रवाह हा वाङ्मयीनदृष्ट्या अनेक अर्थांनी लक्षवेधी ठरला आहे. सातशे वर्षापासून महाराष्ट्राला अज्ञात असलेल्या या प्राचीन वाङ्मयधनाची ओळख थोर साहित्यिक महाराष्ट्र सारस्वतकार कै. श्री. वि. ल. भावे यांनी प्रथम करुन दिली. त्यांनी देशातील पहिल्या 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या' रौप्य महोत्सव प्रसंगी वाचलेल्या **'महाराष्ट्र भाषा सरस्वतीच्या महालातील एक अज्ञात दालन',** या निबंधातून महानुभाव ग्रंथसंपदेचे मराठी मनाला मंगल दर्शन घडविले. या संदर्भात ते म्हणतात 'या महानुभाव ग्रंथसंपदेची संख्या जवळपास सहा ते सात हजाराच्या घरात जाते. शिवाय सातशेच्यावर महानुभाव ग्रंथकारांची नोंद असून ज्या ग्रंथात कवींनी आपले नाव दिले नाही ते ग्रंथ निराळेच' यावरुन या साहित्याची विपुलता आपल्या लक्षात येते. याच अर्थाने प्रा. पुरुषोत्तम नागपुरे यांनी व्यक्त केलेले मत लक्षात घेण्यासारखे आहे. 'महाराष्ट्र सारस्वताची एवढी सेवा अन्य कुणीही केली नाही आणि म्हणूनच या परंपरेस एक साहित्यिक संप्रदाय म्हणून संबोधने यथार्थ आहे.'

**महानुभाव सांप्रदायिक वाङ्मयाचा आरंभ -**

महानुभावीय साहित्य परंपरेचा आरंभ बीजग्रंथ 'लीळाचरित्रा'च्या रूपाने विदर्भातील महानुभावीयांची उत्तर काशी असणाऱ्या श्रीक्षेत्र ऋद्धिपूर याठिकाणी झाला. श्रीचक्रधरांच्या उत्तरपंथी प्रयाणानंतर त्यांचा सर्व अनुयायीवर्ग ऋद्धिपूर याठिकाणी एकत्रित झाला. त्या ठिकाणी वास्तव्य करताना श्रीनागदेवाचार्यांच्या अनुमतीने पंडीत म्हाइंभटांनी श्रीचक्रधरांच्या लीळा संकलनास आरंभ केला. त्यांनी श्रीचक्रधरांनी महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी परीभ्रमण केले त्या त्या ठिकाणी जाऊन तेथील जे जे सर्वज्ञांच्या सन्निधानात आलेले भक्तगण यांच्याकडून त्या लीळांचे संकलन केले. त्याची शुद्धता श्रीनागदेवाचार्यांकडून तपासल्यावर लीळाचरित्राची निर्मिती झाली. लीळाचरित्राच्या निर्मितीनंतर महानुभावीय साहित्य निर्मितीचा आरंभ झाला. त्यानंतर आजतागायत ही साहित्यनिर्मिती चालुच आहे.

महानुभाव साहित्याचा आरंभ जरी गद्य साहित्याने झाला असेल तरी त्यापुढील अनेक साहित्यकृती ह्या गद्य तथा पद्यात निर्मित झाल्या. महानुभाव साहित्य हे गद्य व पद्य या दोन्ही प्रकारांची परीपुर्ण स्वरुपाचे आहे. त्याचा आढावा आपण या प्रस्तुत शोधनिबंधातून घेऊयात.

**महानुभावीय गद्य साहित्य -**

- **'श्री ऋद्धिपूर चरित्रे'**

महानुभावीय गद्य साहित्याचा आरंभ हा लीळाचरित्रापासून झाला हे आपण पाहिलेच. लीळाचरित्राच्या निर्मितीनंतर पंडित म्हाइंभट यांनी श्रीगोविंदप्रभू यांच्या लीळांचे संकलन करून 'श्री ऋद्धिपूर चरित्रे' यासारख्या महत्त्वपूर्ण ग्रंथाची निर्मिती केली. महानुभाव संप्रदायाचे आराध्य असणाऱ्या पाचही अवतारांच्या लीळांचे संकलन करून त्यांना ग्रंथरूप देण्याचे कार्य पंडित म्हाइंभटानीच केले. यानंतर श्रीआचार्यांच्या कालखंडात त्यांच्या अनेकोनेक शिष्यांनी विविध प्रकारच्या ग्रंथाची निर्मिती केली.

- **'श्रीमद् सिद्धांत सूत्रपाठ'**

श्रीआचार्यांचे विद्वान शिष्य पंडित केशिराजबास यांनी लीळाचरित्राच्या मंथनातून श्रीचक्रधरांच्या महत्त्वपूर्ण उक्तींचा 'श्रीमद् सिद्धांत सूत्रपाठ' सिद्ध केला. यामध्ये प्रामुख्याने नवप्रकरण, आचार व विचार ही तीन प्रकरणे त्यांनी निर्माण केली तर उर्वरीत आचारमाळिका आणि विचारमाळिका ही दोन प्रकरणे परशरामबास व रामेश्वरबासांनी तयार केली. यानंतरच्या कालखंडात विद्वांस मुरारीमल्लबास यांनी देखिल 'शोधनीचा सूत्रपाठ' तयार केला. आज सांप्रत घडीला केशिराजबास, परशरामबास आणि रामेश्वरबासांनी सिद्ध केलेला सूत्रपाठ अध्ययनासाठी वापरला जातो. त्यातील सूत्रसंख्या एकूण १२३८ इतकी आहे.

- **'दृष्टांतपाठ'**

सर्वज्ञांनी प्रसंगोप्राप्त वेगवेगळ्या सिद्धांताचे आकलन होण्यासाठी निरुपण केलेल्या दृष्टांताचे संकलन पंडीत केशिराजबास यांनी 'दृष्टांतपाठा'च्या रुपाने केले. दृष्टांताची मांडणी करताना त्यांनी लापनिक, सूत्र, दृष्टांत आणि द्राष्टांतिक अर्थात त्या दृष्टांताचा सिद्धांत अर्थ असे केले आहे. सर्वज्ञांनी सांगितलेल्या ११४ दृष्टांताचे संकलन त्यांनी दृष्टांतपाठात केले आहे. याव्यतिरीक्त मध्यंतरीच्या कालखंडात अनाम कर्त्याकडून ११४ दृष्टांता व्यतिरीक्त मोकळ्या दृष्टांताचेही संकलन झाले आहे.

- **'स्मृतीस्थळ, वृद्धाचार, अन्वयस्थळ**

महानुभावीय गद्य परंपरेतील या वरील सर्व ग्रंथांच्या व्यतिरिक्त महत्त्वपूर्ण ग्रंथ म्हणजेच स्मृतीस्थळ हा होय. लीळाचरित्रामध्ये सर्वज्ञांच्या लीळांचे संकलन करण्यात आले, तसेच स्मृतिस्थळामध्ये प्रथम आचार्य श्रीनागदेव यांच्या आठवणी संकलित करण्यात आल्या आहेत. लीळाचरित्रामध्ये सर्वज्ञांनी आचाराचे निरूपण केले त्याचे आचरण स्मृतीस्थळामध्ये केलेले आपल्याला दिसून येते. यासोबतच कवीश्वरबास, परसरामबास यांच्या आठवणींचे संकलन वृद्धाचारात करण्यात आले आहे. परसरामबासाच्या नंतरची परंपरा याचे चित्रण विविध अन्वयस्थळांमध्ये आपल्याला दिसून येते. महानुभाव वाङ्मयाच्या दृष्टिकोनातून सिद्धांते हरिबासाचे अन्वयस्थळ हे सर्वात महत्त्वपूर्ण माहिती देणारे आहे.

- **पूजावसर, मुर्तिज्ञान, प्रसादसेवा आदी स्फुट प्रकार**

याच कालखंडात महानुभाव साहित्यामध्ये पूजावसर, मूर्तीज्ञान, प्रसादसेवा यासारखे काही स्फूटप्रकार देखील निर्माण झाले. 'पूजावसर' या स्फूटप्रकाराची रचना द्वितीय आचार्य श्रीबाइदेवबासांनी प्रारंभी केली आहे. यानंतरच्या कालखंडामध्ये वेगवेगळ्या साहित्यकारांकडून वेगवेगळ्या प्रकारच्या पूजावसरांच्या रचना गद्य पद्य स्वरूपात झालेल्या आहेत. पूजावसरामध्ये श्रीचक्रधरांच्या दैनंदिनीचे यथायोग्य पद्धतीने त्यांच्या पश्चात असणाऱ्या भक्तांना आठवण्याच्या दृष्टीने त्याचे कर्तृत्व करण्यात आले. पूजावसराची प्रातःकाळ, दुपार व सायंकाळ अशा तीन टप्प्यांमध्ये रचना झाली.

श्रीचक्रधरांची श्रीमूर्ती लीळेच्या माध्यमातून आठवण्यासाठी 'मूर्तिज्ञान' या प्रकाराची रचना करण्यात आली. या प्रकरणाची रचना ही देखील केशराजबासांनी केल्याचे दाखले स्मृतिस्थळात

सापडतात. यामध्ये सर्वज्ञांच्या पायाच्या नखापासून तर डोक्यांच्या केसापर्यंतच्या अवयवांच्या संदर्भाने घडलेल्या लीळांचे संदर्भ प्रस्तुत प्रकरणात देऊन त्या लीळा आठवण्यास सुचविलेले आहे.

पूजावसर, मूर्तीज्ञान याप्रमाणेच महत्त्वपूर्ण असणारे आणखी एक स्फूट प्रकरण म्हणजेच 'प्रसादसेवा' होय. महानुभाव संप्रदायात सर्वज्ञांनी सांगितलेल्या चतुर्विध साधनांना वंदन करण्याची मान्यता आहे. हे चतुर्विध साधन म्हणजेच स्थान, प्रसाद, वासनिक, भिक्षू. यातील द्वितीय साधन म्हणजेच प्रसाद. 'प्रसाद म्हणजे प्रसन्न होऊन दिला तो प्रसाद.' श्रीप्रभूबाबा व सर्वज्ञांनी आपल्या भक्तजनांना प्रसंगोप्राप्त वस्तूच्या, वस्त्राच्या रूपाने अनेक प्रसाद दिले. सर्वज्ञांच्या पश्चात तेच प्रसाद भक्तजन वंदन करत असत, आजही केले जाते. त्या प्रसादाची महती सांगणारे प्रकरण म्हणजेच प्रसादसेवा होय. उत्तरकाळात अशा अनेक प्रसादसेवा महानुभाव साहित्यामध्ये निर्माण झाल्या.

- **भाष्य, महाभाष्य, प्रमेय, बंद आणि स्थळपोथी आदी रचना :**

महानुभाव साहित्य हे प्राधान्याने तत्त्वज्ञाननिष्ठ साहित्य आहे. सूत्रपाठाच्या निर्मितीनंतर त्यावर वेगवेगळ्या भाष्यकारांकडून त्यावर भाष्य तयार करण्यात आली. यात अनेक विद्वानांचा समावेश होता. मात्र गुर्जर शिवबासांनी यातील २४ महत्त्वाच्या भाष्यकारांच्या विचारांना लक्षात घेऊन त्यांचे संदर्भ तिन्ही स्थळाच्या संकलनामध्ये वापरले. तिन्हीस्थळ अर्थातच लक्षणस्थळ, आचारस्थळ व विचारस्थळ होय. या तिन्ही स्थळांच्या निर्मितीनंतर त्यावर विवेचन करणारे अनेक महाभाष्य, प्रमेये, बंद, गुढे, बल्हो, टीका यांची रचना करण्यात आली.

भाष्य, महाभाष्य याबरोबरच महानुभाव संप्रदायातील साहित्यिकांनी अनेक साधन ग्रंथांची देखील रचना केल्याचे आपल्याला दिसून येते. अर्थनिर्णयनशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असा संस्कृत मधील 'लक्षणरत्नाकर' नावाच्या ग्रंथाची रचना पंडित आनेराजबास यांनी केली. या ग्रंथात सर्वज्ञांच्या सूत्रांची अर्थनिर्णायक तत्वे किंवा तंत्रे यातून उलगडून दाखवलेली आढळून येतात. या ग्रंथालाच 'बत्तीस लक्षणाची टीप' असे देखील संबोधले जाते. त्याचबरोबर पंडित आनेराजबासांच्या नावावर 'सुभाषित अंत्याक्षरी', 'दृष्टांतलक्षण' व 'दृष्टांतव्याख्या' असेही आणखी ग्रंथ आढळतात.

लक्षणरत्नाकर या ग्रंथावर पंडित भीष्माचार्य यांनी 'पंचवार्तिक' नावाचा टीपग्रंथ लिहिला. हा मराठी भाषेतील पहिलाच टीपग्रंथ दिसतो. व्याकरणाची शिस्त लावणारा मराठी भाषेतील पहिला व्याकरण ग्रंथ म्हणून याचा उल्लेख केला जातो. तसेच सूत्रपाठातील सूत्रांच्या अर्थाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असणाऱ्या 'प्रकरणवश' या ग्रंथाची निर्मिती पंडित परशरामबास यांनी केली, तसेच त्याच धर्तीवर असणारा 'निरुक्तशेष' या ग्रंथाची निर्मिती पंडित भीष्माचार्य यांनी केली. लीळाचरित्रातील लीळांचे हेतू स्पष्ट करून दाखविणारा 'हेतूस्थळ' या ग्रंथाची निर्मिती गोपीभास्कर, आणि पंडित न्यायंबास या विद्वानांनी केली.

सर्वज्ञांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी परिभ्रमण केले, या सर्व परिभ्रमणातील स्थळांचा आढावा घेणारा स्थानपोथी सारख्या भौगोलिक ग्रंथांची निर्मिती महानुभाव संप्रदायामध्येच सर्वप्रथम झाली. यामध्ये ज्या ज्या ठिकाणी सर्वज्ञांचे वास्तव्य झाले त्या सर्व महत्त्वपूर्ण जागेची संदर्भसूची या ग्रंथात

केलेली आहे. तसेच सर्वज्ञांच्या परिभ्रमणाचा आढावा तीर्थमालिका सारख्या काव्यामध्ये करण्यात आलेला दिसून येतो.

- **गीता टीका :**

महानुभाव संप्रदायाच्या तत्त्वज्ञानानुसार श्रीकृष्ण हा पूर्णावतार असल्याने श्रीकृष्णांच्या संदर्भात सर्वज्ञ सांगतात, "गीता श्रीकृष्णोक्ति : एर अवघी व्यासोक्ति" त्यामुळे सहाजिकच महानुभाव संप्रदायामध्ये श्रीमद्भगवद्गीतेवर अनेक पंडितांनी टीका लिहिलेल्या आहेत. महाराष्ट्र कवीकाव्यसूची मध्ये महाराष्ट्र सारस्वतकार वि.ल.भावे यांनी केलेल्या महानभावीय ग्रंथांच्या सूचीमध्ये जवळपास श्रीमद् भगवद्गीतेवरील २४ पेक्षा अधिक टीका ग्रंथांचा संदर्भ आढळतो. यामध्ये सर्वात प्राचीन लक्ष्मींधरभटकृत गीता टीका आहे. हे नागदेवाचार्यांचे समकालीन होत. आणि श्रीमद्भगवद्गीतेवरील उत्तरकालीन टीका आराध्य मुरलीधर शास्त्री यांची आढळते.

**महानुभावीय पद्य साहित्य -**

- **धवळे :**

महानुभावांची गद्य साहित्य परंपरा जेवढी सशक्त आणि समृद्ध आहे त्याच तुलनेत महानुभावीय साहित्याची पद्य परंपरा देखील महानुभावीय कवींनी समृद्ध केलेली आहे. मराठी साहित्याला वाङ्मयाच्या दृष्टीने अलंकार संपन्न करण्याचे काम महानुभावीय पद्य परंपरेने केलेलं आहे. मराठीतील काव्याची परंपरा हीच महानुभावीय पद्याने सुरुवात होते. मराठीतील आद्य कवियत्री साध्वी पंडिता महादाइसा या होय. यांनी धवळ्याच्या रूपाने मराठी काव्य सरिता प्रवाहित केलेली आहे. श्रीगोविंदप्रभूंच्या सन्निधानात असताना श्रीप्रभूंना एकदा विवाह करण्याची इच्छा निर्माण झाली. त्यावेळी त्यांनी महादाइसांना आज्ञा केली, "अहो मेली जाए : गाए गाए म्हणे" आणि यावरच अत्यंत प्रभावशाली असे धवळ्याच्या रूपाने ती प्रगट झाली.

महादाइसांनी लिहिलेले धवळे सहज सौंदर्याने भरलेले आहे. श्रीकृष्ण रुक्मिणीच्या विवाहाची ही कथा एका आगळ्यावेगळ्या स्वरूपामध्ये आपल्याला पाहायला मिळते. धवळ्याच्या व्यतिरिक्त महादाइसांच्या नावावर 'मातृकी रुक्मिणीस्वयंवर' नावाची दुसरी ही एक काव्यरचना आहे ज्यामध्ये ११० श्लोक आहेत. मातृकी रुक्मिणी स्वयंवराची रचना ही वर्णमालेच्या क्रमाने करण्यात आल्याने त्याला मातृकी रुक्मिणी स्वयंवर अशी नमना प्राप्त झालेली आहे.

- **मुर्तिप्रकाश** :

महानुभाव साहित्य परंपरेमध्ये धवळ्यानंतर निर्माण झालेला मराठीतील प्रदीर्घ असे काव्य म्हणजे 'मूर्तीप्रकाश' होय. याचे कर्तृत्व पंडित केशिराजबासांनी केलेले आहे. मूर्तीप्रकाशाची रचना ही इ.स. १२८९ म्हणजेच ज्ञानेश्वरीच्या एक वर्ष अगोदर झाली आहे. त्या अगोदर त्यांनी लीळाचरित्राचे संस्कृत मध्ये सर्वप्रथम भाषांतर 'रत्नमालास्तोत्र' या नावाने केलेले आहे. मूर्तीप्रकाश या ग्रंथामध्ये सर्वज्ञांच्या श्रीमूर्तीचे वर्णन केलेले आहे.

- **सप्त काव्यग्रंथ :**

महानुभाव संप्रदायामध्ये भक्तीच्या ओथंबलेल्या प्रवाहातून अनेक पद्य कलाकृती निर्माण झाल्या. सर्वज्ञांच्या 'गीत विखो' या वचनाच्या विरुद्ध जाऊन जे गीत ईश्वर भक्तीने सिद्ध आहे, अशा काव्यांची रचना मोठ्या प्रमाणात संप्रदायांमध्ये होत गेली. लीळाचरित्रकार पंडित म्हाइंभटापासून ते अगदी अलीकडच्या काळातील नवोदित कवी पर्यंत अनेकांना काव्य करण्याचा मोह आवरता आलेला नाही. यातूनच अनेकोनेक काव्यांची प्रदीर्घ परंपरा महानुभाव साहित्य परंपरेला लाभलेली आहे. या सर्व काव्य परंपरेत सात प्रमुख काव्यग्रंथ मानले जातात. ज्यांची रचना महानुभाव साहित्य परंपरेच्या प्रारंभीच झाली आहे.

सप्तकाव्यग्रंथांमध्ये सर्वात प्रथम निर्मिती झाली ती नरेंद्राच्या 'रुक्मिणी स्वयंवराची' (इ.स.१२९३). रामदेवराय यादवाच्या राज्यसभेतील हा राजकवी. यांनी श्रीकृष्ण रुक्मिणी विवाहाची कथा इतक्या अप्रतिम शब्द सौंदर्याने बंदिस्त केली की प्रत्यक्ष राजालाही ही साहित्यकृती माझ्या नावाने प्रसिद्ध व्हावी अशी असा लोभ निर्माण झाला. त्याने द्रव्याचे आमिष दाखवून ही कलाकृती विकत घेण्याचा प्रयत्न केला असता बाणेदारपणे, "ना राजे हो : आमुचेया कवी कुळा बोलू लागेल" असे सांगून त्याला विरोध करून आपल्या काव्यासहित नरेंद्र आपले गुरु नागदेवाचार्यांच्या आश्रमात निघून आले. त्या ठिकाणी संन्यास घेऊन आपली जीवन व्यतीत करू लागले.

महानुभाव संप्रदायाचे तृतीय आचार्य भास्करभट्ट बोरीकर उर्फ कवीश्वरबास यांनी श्रीनागदेवाचार्यांच्या पश्चात राजसूय यज्ञ, शिशुपाल वध या आख्यानकावर आधारीत श्रृंगार रस प्रधान 'शिशुपाल वध' (इ.स.१३१२) या ग्रंथाची निर्मिती केली. परंतु तत्कालीन आचार्य श्रीबाइदेवबासांनी हा ग्रंथ निवृत्त साधकांसाठीचा नव्हे असे सांगितल्यावर त्यांनी श्रीकृष्ण उद्धवदेव यांच्या सवांद निरुपणावर आधारीत 'उद्धवगीता' (इ.स.१३१३) या ग्रंथाची रचना केली.

पंडित दामोदरबासांनी श्रीकृष्णाच्या गोकुळातील 'ब्रह्मदर्पहरण' या लीळेच्या अनुषंगाने 'वच्छाहरण' (इ.स.१३१६) या काव्यग्रंथाची निर्मिती केली. यामध्ये ब्रह्मदेव बालकृष्णाची परीक्षा पाहण्यासाठी गोकुळातील गाई चोरून नेतो व त्यामध्ये त्याचीच फजिती होते या आख्यानाचे वर्णन केलेले आहे. पंडित रवळोबास यांनी श्रीदत्तात्रेयप्रभूंचे तीर्थस्थान सह्याद्री पर्वताच्या महात्म्य वर्णनपर 'सह्याद्री वर्णन' (इ.स.१३५३) या नावाच्या ग्रंथाची रचना केली आहे. यामध्ये सह्याद्री पर्वत, माहूर गडाचे वर्णन केलेले असून श्रीदत्तात्रेय प्रभूंच्या मूर्तीचे देखील वर्णन केलेले आहे.

सप्तकाव्य ग्रंथपरंपरेतील अजून एक स्थळवर्णनपर महत्त्वपूर्ण ग्रंथ म्हणजे 'श्रीरिद्धपूर वर्णन'. या ग्रंथाचे कर्तुत्व पंडित नारायणव्यास बहाळीये यांनी केलेले आहे. त्यांनी श्रीप्रभूबाबा यांच्या संबंधाने पवित्र झालेल्या श्रीक्षेत्र रिद्धपूर या स्थानाते महात्म्य वर्णन केलेले आहे. तसेच त्यांचे सांगाती पंडित विश्वनाथबास बाळापूरकर यांनी श्रीमद् भगवद्गीतेतील तेराव्या अध्यायाच्या सात ते अकरा या पाच लोकांवर जवळपास बाराशे ओव्यांचा तत्त्वज्ञानावर आधारित असणारा 'ज्ञानप्रबोध' या ग्रंथाची निर्मिती केलेली आहे.

या साती ग्रंथांचा विचार केला असता आपल्या लक्षात येते की, यातील चार ग्रंथ हे श्रीकृष्ण आख्यानपर आहेत, तर दोन ग्रंथ स्थळवर्णनपर व एक ग्रंथ तत्त्वज्ञानपर आहे. हे सर्व कवी प्रतिभावंत असल्याचे आपल्या निदर्शनास येते यांनी महानुभावीय नव्हे नव्हे तर मराठी साहित्य अवकाशात स्वतःचे असे अढळपद निर्माण केलेले आहे.

याव्यतिरिक्त महानुभावीय पद्य साहित्य परंपरेमध्ये अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या काव्य प्रकारांची निर्मिती महानुभाव साहित्यकारांनी केलेली आहे. यात धुवा, चौपदी, आरती, आख्यानकाव्ये, स्वयंवरकाव्ये, पदे, लोकगीते, आबाब, ओव्या स्थलवर्णनपर गीते, मुर्तिवर्णने अशा वेगवेगळ्या साहित्यप्रकारांना महानुभावीय कवींनी हाताळले आहे. आजही महानुभावीय नवोदित कवी ही परंपरा पुढे नेत आहे.

- **समारोप :**

महानुभावीय साहित्य परंपरेचा आढावा हा लघुनिबंधाच्या दृष्टीने अशक्य असणारा विषय आहे. महाराष्ट्र सारस्वतकार वि.ल.भावे म्हणतात महानुभावीय नामनिर्देशित साहित्याकृतींची संख्या जवळपास पाच ते सहा हजारवर असून अनाम कवीकृत साहित्य देखिल पुष्कळ प्रमाणात आहे. तरीही संक्षिप्त रूपाने त्याचा आढावा घेण्याचा हा प्रयत्न केलेला आहे. महानुभावीय साहित्यातील मराठी साहित्य परंपरा ही निश्चितच समृद्ध केलेली आहे. त्या समृद्ध साहित्य परंपरेचा अल्पसा परिचय करून देण्याचा हा प्रयत्न.

- **संदर्भग्रंथ :**


१) कोलते वि.भी, **लीळाचरित्र**, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८२, द्वितियावृत्ती
२) देशपांडे. वा. ना. **स्मृतिस्थळ**, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९९७, सहावी आवृत्ती
३) श्रीदेवदत्त आश्रम, **एकादश आम्नायाची अन्वयस्थळे**, देवदत्त प्रकाशन, मांजरवाडी (जाधववाडी), २०२०, प्रथमावृत्ती
४) भावे. वि. ल. **महानुभाव महाराष्ट्र ग्रंथावली कविकाव्य सूची**, भावे. वि.ल. ठाणे, १९२४ प्रथमावृत्ती (PDF)
५) कै. कोळपकर मुरलीधर, **महानुभावांचा इतिहास**, महंत. प्रभाकरबाबा संन्यासी, द्वितीयावृत्ती